मा. अधि.

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१२६/२०१८
दि.०५/१०/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.गोविंद धोंडी परब, ................अपिलार्थी
३०३/ए, जय साई विहार को.ऑ.हौ.सो.,
कस्तुरी गार्डन कॉम्प्लेक्स, भाईंदर (प.).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
विभागप्रमुख (सा.प्र.)

## -: विवेचन :-

श्री.गोविंद धोंडी परब यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांचेकडे दि.०९/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) सामान्य प्रशासन विभागांतर्गत आवक पत्रव्यवहार स्विकारणाऱ्या विभागामार्फत आलेल्या पत्राची नोंद घेण्यात येते. त्या रजिस्टरची उक्त कालावधीची साक्षांकीत छायाप्रत.

२) उक्त कालावधीत सामान्य प्रशासन मुख्याधिकारी दालन येथे स्वतंत्ररित्या सरकारी प्राप्त पत्रव्यवहार नोंद ठेवण्यात येत असे. (उदा.तारांकित/ अतारांकित प्रश्न, मा.जिल्हाधिकारी, मा.विभागीय कोकण आयुक्त, नगरपालिका प्रशासन संचालनालय व मंत्रालयातून प्राप्त पत्रव्यवहाराची स्वतंत्र (बारनिशी) नोंद रजिस्टर ठेवण्यात येत होती. त्या रजिस्टरची साक्षांकित छायाप्रत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत दि.०९/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२१/०९/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व विभागप्रमुख (सा.प्र.) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२९/०९/२०१८ रोजी दुपारी १२.०५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.सा.प्र./३६७/२०१८ दि.२५/०९/२०१८ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.) हे मा.स्थायी समिती सभेस उपस्थित असल्याने सुनावणी रद्द करण्यात आली असुन सदर सुनावणी दि.०५/१०/२०१८ रोजी दुपारी ०३.०५ वाजता आयोजित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने अपिलार्थी अर्जदार व

जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांना जा.क्र.मिभामनपा/ उपआ.सा.प्र./३७१/२०१८ दि.२९/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) हे व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माहिती अधिकार अंतर्गत मला माहिती प्राप्त झाली आहे.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) अपिलार्थी अर्जदार यांनी सुनावणी दरम्यान माहिती मिळाल्याचे मान्य केले असल्याने सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.गोविंद धोंडी परब,
३०३/ए, जय साई विहार को.ऑ.हौ.सो.,
कस्तुरी गार्डन कॉम्प्लेक्स, भाईंदर (प.).

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (सा.प्र.)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.) यांचे कार्यालय.